## अॅग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनी 10 नोव्हेंबरपासून

# उपराष्ट्रपती नायडूंच्या हस्ते होणार उद्घाटन

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माहिती

नागपूर. विदर्भाच्या विकासाचे व नवी दिशा ठरणारे अॅग्रो व्हिजन विदर्भातील शेतकऱ्यांसाठी संपन्नतेचा महामार्ग ठरते. मध्य भारतातील सर्वांत मोठे कृषी प्रदर्शन अॅग्रोव्हिजन 10 ते 13 नोव्हेंबर दरम्यान रेशीमबाग मैदानावर आयोजित करण्यात आल्याची माहीती पत्रपरिषदेत केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी दिली. अॅग्रोव्हिजन प्रदर्शनीचे उद्घाटन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांच्या हस्ते होणार असून यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे कृषीमंत्री पांडुरंग फुंडकर, राज्याचे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### 21 विषयांवर कार्यशाळा



यावर्षी सुमारे 21 विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून कार्यशाळांमध्ये नवीन पीके, पाणी, व्यवस्थापन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधमाशीपालन आदी शेतीपुरक व्यवसाय व विषयांचा समावेश आहे. याशिवाय बांबू लागवड व संधी विषयावर चर्चासत्र देखील आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना विविध शेतीविषयक माहीती मिळावी म्हणून अॅग्रोव्हिजन अॅपचे लोकार्पन करण्यात आले. विदर्भातील शेतकऱ्यांनी अॅग्रोव्हिजनचा मोठ्या संख्येने उपस्थित राहूण प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. पत्रपरिषदेत अॅग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी. डी. मायी, ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी आ. गिरीश गांधी, माजी खा. दत्ता मेघे, रमेश मानकर, रवी बोरटकर आदी उपस्थित होते.

### 400 पेक्षा अधिक कंपन्यांचा सहभाग

अॅग्रो व्हिजनमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आघाडीच्या असलेल्या सुमारे 400 पेक्षा अधिक कृषीविषयक कंपन्या, संशोधन संस्था, नवउद्योजक, शेतकरी संशोधन, वित्त संस्था, कृषी विद्यापीठे, शेती संबंधीत शासकीय विभाग, सेवा पुरवठादार आदींचा सहभाग राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. दुग्ध विकास, बांबू लागवड, सेंद्रीय शेती आदी प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण राहणार आहे.